# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०३/२०२१

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०५/०३/२०२१ रोजी सभा सुचना क्र. ११ दि. ०१/०३/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. दिनेश तेजराज जैन हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | |
|---|---|
| १. श्री. दिनेश तेजराज जैन | सभापती |
| २. श्री. अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ३. श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| ५. श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ६. श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ७. श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | सदस्या |
| ८. श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी | सदस्या |
| ९. श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| १०. श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ११. श्री. एलायस दुमिंग बांड्या | सदस्य |
| १२. श्री. कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| १३. श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| १४. श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १५. श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १६. श्रीम. गिता हरीश परदेशी | सदस्या |

**गैरहजर सदस्य - निरंक**

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

सर्व सदस्यांचे आजच्या सभेमध्ये स्वागत आहे. नवनिर्वाचित सभापती मा. दिनेश जैन ह्यांची पहिलीच सभा घेत आहोत. त्याच प्रमाणे मिरा भाईंदर महापालिकेच्या आयुक्त पदी नव्याने नियुक्त झालेले मा. दिलीप ढोले साहेब हे देखील आयुक्त म्हणून प्रथमच कामकाजाला सुरुवात करणार आहेत. आजच्या सभेच्या कामकाजपूर्वी मा. स्थायी समिती सभापती, मा. दिलीप ढोले साहेब ह्यांचे स्वागतकरतील. सर्व स्थायी समिती सदस्य आणि प्रशासनाच्या वतीने स्वागतकरण्यांत येत आहे.

**अनिल सावंत :-**

**काँग्रेस पक्षाच्या वतीने नवनिर्वाचित सभापती दिनेश जैन ह्यांचे अभिनंदन वर्षभराच्या काळामध्ये पक्षीय मतभेद बाजूला ठेवून ह्या शहरासाठी जे काही चांगले असेलते पूर्ण करण्याचे प्रयत्न करतील आणि त्यासाठी आमचा पूर्ण सहयोग असेल. तसेच दोन दिवसांपूर्वी मिरा भाईंदर महापालिकेच्या आयुक्त पदी दिलीप ढोले ह्यांचे देखील काँग्रेस पक्षाच्या वतीने हार्दिक स्वागत करतो. दिलीप ढोले साहेबांनी महाराष्ट्र शासनाच्या विविध डिपार्टमेंटमध्ये काम केले आहे. त्यांना चांगला प्रशासकीय अनुभव आहे.ह्या शहराची जाण आहे. त्यांना दीर्घ कार्यकाळ लाभावा अशी इच्छा व्यक्त करतो. त्यांच्या कार्यकाळामध्ये जी काही अर्धवट कामे आहेत पाण्याचा मुख्य प्रश्न आहे तो प्रश्न त्यांच्या अनुभवातून मार्गी लागतील अशी आशा करतो आणि त्यांना पूढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.**

**कमलेश भोईर :-**

**शिवसेना पक्षातर्फे मा.दिलीप ढोले साहेब ह्याचे हार्दिक स्वागत आणि अभिनंदन तसेच मा. दिनेश जैन ह्यांचे अभिनंदन.त्यांच्या हातून शहरासाठी चांगली कामे व्हावीत सर्वांना एकत्र घेऊन पूढे चालत रहावे.**

**हसमुख गेहलोत :-**

**सभी को नमस्कार हमारे नवनिर्वाचित सभापती दिनेश जैन को बी.जे.पी. और सभी सदस्य की और से दिल से शुभ कामनाए और साथ ही साथ दिलीप ढोले उनका भी मिरा भाईंदर महापालिका में भाजपा और सभी सदस्य की और से शुभकामनाए। दो ऐसे मेन पौधे है की एक को निर्णय लेना है और एक के पास पूरी चाबी है। मैं चाहूँगा सभी को लेके शहर के हित में काम हो और सावंत साहब ने यह कहाँ की ढोले साहेब पूरा कार्यकाल यहाँ पूर्ण करेंगे। राज्य शासनने पिछले सव्वा साल में चार आयुक्त दिए अगली बार इस तरह का माहौल ना हो और ढोले साहेब का पूरा कार्यकाल यहाँ बिताया जाए ऐसी में शुभकामना दूंगा और राज्य शासनको निवेदन करुंगा की पूरा कार्यकाल जब तक नही तब तक मिरा भाईंदर को प्रयोग शाळा की तरह वापरके नया आयुक्त ना दिया जाए।दोनो की तरफ से सभी सदस्योको साथ में लिया जाएगा। सभी सदस्योको मानसन्मान रखा जाएगा। यही में कामना करता हूँ धन्यवाद।**

**दिनेश जैन :-**

**मिरा भाईंदर महापालिका स्थायी समिती आज पहली सभा में बी.जे.पी के सभी नगरसेवक, शिवसेना के सभी नगरसेवक, काँग्रेस पार्टीके सभी नगरसेवक जिन्होंने मुझे सभापती बनाने में योगदान दिया उसका दिल से धन्यवाद। मिरा भाईंदर महापालिकाके नवनिर्वाचित आयुक्त मा. श्री. दिलीप ढोले उनका मैं दिलकी गहराईयों से स्वागत करता हूँ। मैं जबसे सदस्य हूँ जिस दिन से दिलीप ढोलेजी अतिरिक्त आयुक्त का कामकाज संभाल रहे थे तो उनकी काम करने की गती और स्टाईल इतनी अच्छी थी मुझे पता है वो जो काम बोलेंगे वो १०० टक्का करेंगे और नही होगा यह जो उनका स्टाईल है वो मिरा भाईंदर को विकासको आगे तक लेके जाएगा। ऐसी में आशा करता हूँ।किस्मत से मैंने ३ तारीखको पदभार संभाला और आयुक्तका भी ३ तारीखको ऑर्डर आया और हम तीन पक्ष की सरकार चला रहे है। हमारे आयुक्तकी और मेरी राशी भी एक है। काम मेंकोई टेन्शन नही होगा हमारे माजी आमदार हमेशा कहते है भेदभावछोड करमिरा भाईंदरकाविकासकैसे हो उस दिशा में प्रयत्न करना चाहिए और हम सभी उसी दिशा में काम करने की कोशिश करेंगे। सभी सदस्योका मान सन्मान रखते हुए में वो काम पूरा करनेकी कोशिश करुंगा और में आपका भी पूरा सहयोग चाहूँगा की जैसे भी कोई विषय आते है तो सदस्य उत्तेजितन होते हुए अपनी बातको व्यवस्थित रखेक्योंकी २-३ जन बोलते है तो वो अधिकारीयो को समझ में नही आता है इसके लिए वो विषय अलग ट्रॅक पे चला जाता है। तो सबके बोलने की अनुमती दी जाएगी। १-१ नगरसेवक अपनी बात रखेंगे तो जो भी ठराव करेंगे उसके लिए अच्छा रहेगा। और आयुक्त के साथ साथ जितने भी अधिकारी है कर्मचारीको मेरी दिल से शुभकामनाए और वो मेरे पुरे कार्यकाल में सहयोग करे। क्योंकी पिछले कार्यकाल में कोरोना की वजह से कुछ विकास काम नही हुए। तो मैं आयुक्त से निवेदन**

करुंगा हम जादा से जादा महाराष्ट्र सरकार से निधी विकास के लिए ला सकते है। आप भी सहयोग दो शिवसेना पक्ष भी सहयोग देंगे, काँग्रेस पक्ष भी देगा। जिने भी स्थायी समिती के सदस्य है उनके उज्ज्वल भविष्य की शुभकामनाए करता हूँ।

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती महोदय सर्व सन्मा. सदस्य सर्व अधिकारी आणि कर्मचारी दि. ३ मार्च रोजी महाराष्ट्र शासनाने माझी अतिरिक्त पदावरुन आयुक्त पदावर नियुक्ती केली आणि त्याच दिवशी संध्याकाळी आयुक्त पदाचा कार्यभार मी स्विकारला आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त करताना माझे स्वागत करताना ह्या शहराच्या विकासाची योजना ह्या शहरात किती कालावधीत किती आयुक्त झाले हा एक परामर्ष केलेले आहे त्या अनुषंगाने किंवा माझ्याकडून सर्व सन्मा. सदस्यांनी काय अपेक्षा केली आहे. शासनाकडून निधी आणणे सर्वांना घेऊन चालणे, शहराचा विकास करणे तर मी पहिल्याच सभेमध्ये मी आपल्याला आश्वासन कर इच्छितो सर्व समावेशक शहराचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन चालण्यासाठी हे शहर ही महापालिका गतिमान आहे हे सिध्द करण्यासाठी किंवा जनमाणसात तशी प्रतिमा तयार होण्यासाठी आयुक्त म्हणून मी कटीबध्द असेल. तसेच जिथपर्यंत मी इथे असेल त्या शेवटच्या दिवसा पर्यंत तशा प्रकारचे प्रयत्न करणार राज्य शासनाचा आणि महापालिकेचा समन्वय साधून जास्तीत जास्त निधी वेगवेगळया संस्थामार्फत जसे एम.एम.आर.डी.ए. किंवा सिडको किंवा राज्य शासनाचे नगरविकासचे योजना असतील त्यामार्फत माझ्या प्रशासकीय कामाचा अनुभव ह्या सगळ्या बाबीचा कसोशिने पालन करुन जास्तीत जास्त निधी आणण्याचा आणि सर्व समावेशक काम करुन ह्या शहराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मी वचनबध्द असेल एवढे बोलून दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि . ०५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय , दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ११ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ८२, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण " + "अंध व अपंग " + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण"), प्रकरण क्र. ८३, परिवहन सेवेचे सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक मा . स्थायी समितीस सादर करणेबाबत. प्रकरण क्र. ८४, अग्निशमन विभागाचे सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक मा . स्थायी समितीस सादर करणेबाबत . प्रकरण क्र. ८२, ८४ ची अंदाजपत्रक सादर केली जातील. त्यानंतर परिवहनचे अंदाजपत्रक परिवहन समितीचे सभापती ह्या ठिकाणी सादर करणार आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीचे सभापती श्री. अशोक तिवारी उपस्थित सन्माननीय स्थायी समिती सदस्य , अधिकारी व कर्मचारी वर्ग , महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 95 अन्वये सन 2020-21 चे सुधारित व सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अर्थसंकल्पिय अंदाज आपणासमोर सादर करीत आहे.

शहरवासीयांना मुलभूत सेवा/सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्ये आहे. यासाठी सन 2019-20 या आर्थिक वर्षात पुरविण्यांत आलेल्या मुलभूत से वासुविधांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 95(अ) नुसार सादर करावयाचा अहवाल अर्थसंकल्पासोबत जोडण्यांत आलेला आहे . कृपया या अहवालाचे अवलोकन व्हावे. दिवसेंदिवस मुलभूत सेवा/सुविधा पुरविण्यांत दरवर्षी तूट येत आहे.

**या सेवांपासून प्राप्त होणारे अल्प उत्पन्न पा हता खर्च मोठयाप्रमाणात करावा लागत आहे . परिणामी यामध्ये तूट येत आहे. अशी तूट वर्षानुवर्षे येत राहिली तर भविष्यात मुलभूत सेवा/सुविधा पुरविणे अवघड होऊन बसेल . यासाठी महानगरपालिकेच्या उत्पन्नात कर /दर वाढ होणे अनिवार्य आहे . मोठमोठया योजना/प्रकल्प राबविण्यासाठी स्वनिधी उपलब्ध होत नसल्याने कर्ज उभारणी करून योजना /प्रकल्प राबवावे लागत आहेत . आजतागायत रक्कम रु .286.31 कोटी इतके कर्जाचे दायित्व महानगरपालिकेवर आहे.**

**महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीनुसार कर्जउभारणी करण्यासाठी वित्तीय संस्था कर्जपरतफेड क्षमता विचारात घेवूनच कर्ज मंजूर करत असतात . यासाठी भांडवली उत्पन्न देखील वाढविणे आवश्यक आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात मागील 3 वर्षातील सरासरी प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चावर आधारीत लेखाशिर्षनिहाय तरतूदी करण्यांत आलेल्या आहेत . मर्यादित उत्पन्नाचा विचार करता शासकिय अनुदाने प्राप्त होण्यासाठी विभागांना आपआपले प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत सुचित करण्यांत आलेले आहे. या अर्थसंकल्पात महानगरपालिका स्वनिधी/कर्ज/अनुदाने यांचा समावेश करण्यांत आला आहे. याबाबतच्या उत्पन्न/खर्चाच्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे.**

(आकडे कोटीत)

| उत्पन्नाच्या ठळक बाबी | | | खर्चाच्या ठळक बाबी | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर | 85.00 | 1 | पाणीपुरवठा जलनिःसारण व मलनिःसारण | 164.75 |
| 2 | GST अनुदान | 239.25 | 2 | स्थायी/अस्थायी वेतनातील खर्च | 156.16 |
| 3 | 1% मुद्रांक शुल्क अधिभार | 25.00 | 3 | आरोग्य- वॉर्ड सफाई, नालेसफाई, घनकचरा व्यवस्थापन | 159.70 |
| 4 | पाणी पुरवठा जलनिःसारण व मलनिःसारण | 109.16 | 4 | सार्वजनिक बांधकाम | 475.00 |
| 5 | इमारत विकास आकार/मुलभूत सुविधा शुल्क | 70.00 | 5 | कर्ज परतफेड निधी | 47.92 |
| 6 | रस्ता नुकसान भरपाई | 50.00 | 6 | विजदेयक/विद्युतकामे | 44.45 |
| 7 | मोकळया जागेवरील कर | 20.00 | 7 | शिक्षण विभाग | 24.46 |
| 8 | आरोग्य घनकचरा व्यवस्थापन शुल्क | 16.55 | 8 | विकास आराखडा/नगररचना विभाग | 12.35 |
| 9 | बाजार फी | 7.00 | 9 | उद्यान विकास | 17.85 |
| 10 | जाहिरात/होर्डींग्ज/पे ॲण्ड पार्क | 8.80 | 10 | नगरसेवक निधी/प्रभाग निधी | 25.72 |
| 11 | अनधिकृत बांधकाम शास्ती | 3.25 | 11 | रुग्णालये/दवाखाना | 25.25 |
| 12 | परवाना फी | 3.00 | 12 | वृक्षप्राधिकरण | 9.00 |
| 13 | विशेष शिक्षण कर | 5.74 | 13 | आपत्ती व्यवस्थापन (कोविड-19) | 41.00 |
| 14 | वृक्षकर | 2.87 | 14 | “P” अंदाजपत्रक | 146.68 |
| 15 | भांडवली जमा | 15.32 | 15 | महिला बालकल्याण | 3.00 |
| 16 | कर्ज | 185.41 | 16 | अंध व अपंग योजना | 1.75 |
| 17 | शासन अनुदान | 560.20 | 17 | JUNNURM | 45.80 |

अर्थसंकल्पातील महत्वाच्या योजना/प्रकल्प खालीलप्रमाणे आहेत.

(आकडे कोटीत)

| अ.क्र | | |
|---|---|---|
| 1 | मुख्यमंत्री सडक योजना/नगरोत्थान अभियान (सिमेंट कॉंक्रीट रस्ते बांधकाम) | 102.00 |
| 2 | पर्जन्य जलवाहिन्या अमृत अभियान | 29.00 |
| 3 | मा. बाळासाहेब ठाकरे व मा. प्रमोद महाजन आर्ट गॅलरी/कलादालन उभारणे | 45.00 |
| 4 | UTWT सिमेंट रस्ते बांधकाम | 25.00 |
| 5 | नविन रस्ते बांधकाम/गटारे बांधकाम | 20.00 |
| 6 | किल्ला जीर्णोध्दार (शिवसृष्टी प्रकल्प राबविणे) व सुशोभिकरण करणे | 8.00 |
| 7 | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे व सुशोभिरण | 4.00 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधकाम | 12.00 |
| 9 | अर्बन हेल्थ कायापालट करणे | 1.00 |
| 10 | 218 द.ल.लि. सुर्या प्रकल्प पाणीपुरवठा योजना | 50.00 |
| 11 | स्पोटर्स क्लब/जिमनॅस्टिक स्टेडीयम उभारणे | 1.00 |

महानगरपालिकेचे अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता सन 2020-2021 व सन 2021-2022 चे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.1265 कोटी 86 लाख 50 हजार जमा व खर्च रु.1261 कोटी 39 लाख तसेच सन 2021-2022 चे मुळ अर्थसंकल्पात अपेक्षित उत्पन्न रक्कम रु.1509 कोटी 17 लाख 35 हजार व खर्च रु.1508 कोटी 91 लाख 50 हजार व रक्कम रु.25 लाख 85 हजार इतक्या शिल्लक रकमेचा व कुठल्याही प्रकारची कर/दर वाढ न करण्यांत आलेला अर्थसंकल्प मा. स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायीसमिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधीपक्ष नेता व महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग शहरातील विचारवंत, वृत्तपत्र प्रतिनिधी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच संपुर्ण जगावर ओढावलेल्या COVID-19 या आपतकालीन परिस्थितीमध्ये देखील आपले सर्वांचे सहाकार्याने एकजुटीने COVID-19 चा मुकाबला करू शकलो याबद्दल आपले सर्वांचे मनापासून आभार मानतो. अर्थसंकल्पातील उद्दिष्ट पुर्ततेसाठी यापुढेही आपल्या सर्वांचे सहकार्याची अपेक्षा करतो.

धन्यवाद !

**नगरसचिव** :-

**परिवहन समितीचे सभापती अंदाजपत्रकाबद्दल आपले मनोगत व्यक्तकरतात**.

**दिलीप जैन** :-

**सन्मा. स्थायी समिती सभापतीदिनेशतेजराजजैन सर्व सन्मा. सदस्य, मा. आयुक्त अधिकारी व कर्मचारी वर्ग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमकलम ३७ अन्वये परिवहन व्यवस्थापक ह्यांनी परिवहन समितीकडे सादर केलेल्या अंदाजपत्रकात काही दुरुस्ती सुचवून परिवहन समिती सभा दि. २६/०२/२०२१ ठराव क्र. २८ नुसार मंजूर अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९८ नुसार आपणां समोर सादर करीत आहे. परिवहन उपक्रम ही शहरासाठीची मूलभूत सेवा असल्याने नफा कमावणे हा ह्या सेवेचा उद्देश नसून नागरिकांच्या सेवेसाठी व सेवेसाठी परिवहन सेवा चालविण्यासाठी आवश्यकता आहे सध्या परिवहन सेवेत ७४ बसेस प्रवर्तनासाठी उपलब्ध असून ११ बसेस सेवेत दाखल होणार आहेत ही सेवा चालवण्यासाठी महापालिकेनी**

एन.सी.सी. विथ व्हि.जी.एफ तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात बस ऑपरेटर नियुक्त केलेला असून निविदा प्रक्रियेद्वारे बस ऑपरेटर नियुक्त करण्याची कारवाई सुरु आहे. परिवहन उपक्रमासाठी अद्यावत बस डेपो कार्यशाळा उभारण्यात आलेली आहे. त्यामध्ये अद्यावत डेपो इक्वीपमेंट आय.टी.एस कंट्रोल सेंटर तसेच इलेक्ट्रॉनिक टीकीटींग सुविधा त्याबरोबर माझी बस मोबाईल ॲप सेवा देण्यात आलेली आहे. शहरातील परिवहन सेवा ही प्रवाशांना सुखकर आणि सुरळीत सुरु राहण्यासाठी महापालिकेकडून परिवहन उपक्रमास अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. ह्या अंदाजपत्रकात आगामी वर्षामध्ये १५ नविन बस खरेदी करण्यासाठी तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. आपले सर्वांचे सहकार्य वेळोवेळी लाभले आहे व ह्या पुढे अशाच प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा करतो व सर्वांचे मनापासून आभार मानतो. धन्यवाद.

**नगरसचिव** :-

अंदाजपत्रकाचे सादरीकरण झालेले आहे.

**मा. सभापती** :-

अशाच प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पाडू या. सभा संपली असे मी जाहिर करतो.

(**सभा संपण्याची वेळ दु. १२.१५ वाजता**)

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

